शीर्षक - वारी

विठू राहे पंढरपुरी
मंदिर चंद्रभागा तिरी
आली आली आषाढी
वारीत चाले वारकरी ॥

पाहण्यास श्री विठ्ठला
भाव अंतरी हो दाटला
टाळ चिपळ्या वाजवी
हरिनाम ते ओठांवरी ॥

वीणा टाळ, मृदंग वाजे
रामकृष्ण हरी नाम साजे
आनंद अनिवार हो अंतरी
जयघोष करी वारकरी ॥

पंढरपुरी जाती वारकरी
पाहण्या सावळा श्रीहरी
कधी ना चुकावी ही वारी
कवी अरुणदास प्रार्थी हरी ॥

॥ जय जय रामकृष्ण हरी ॥

—x—

कवी -
अरुणदास - अरुण वि. देशपांडे
पाटील नगर, बावधन (बु) - पुणे. ४११०२१
मोबा. 9850177342